# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १८२-२३** **दिनांक ०७/०६/२०२३**

**स्वत:च्या लग्न खर्चासाठी ज्वेलर्स व्यापाऱ्याला गावठी कट्टयाचा धाक दाखवुन लुटणाऱ्या मुख्य आरोपीतास उत्तरप्रदेश येथून अटक.**
**गुन्हे शाखा, कक्ष ०१ काशिमिरा पथकाची कामगिरी.**

----ooooo----

दिनांक २७/०५/२०२३ रोजी ०४.१० वा. फिर्यादी श्री. मोहीत रमेश कोठारी, वय ३२ वर्षे, धंदा ज्वेलर्स दुकान, रा. विनय टॉवर, विनयनगर, पुजापार्क जवळ, मिरारोड पुर्व यांचे कोठारी ज्वेलर्स, शॉप नं. ११, बि.क्र. २०, आरएनए ब्रॉडवे ॲव्हेन्यु, जहांगिड सर्कल जवळ, मिरारोड पुर्व येथे दोन अनोळखी इसमांनी आपसांत संगणमत करुन त्यांचेकडील गावठी कट्टयाचा धाक दाखवुन फिर्यादी यांचा मोबाईल जबरीने चोरी करुन घेवुन गेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणेत गु.र.क्र. २०७/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३९४, ३४ सह भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ व २५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा समांतर तपास करीत असताना गुन्हयातील मुख्य आरोपी आशुतोष कुमार ऊर्फ शिवम संतोषकुमार गुप्ता, वय ३० वर्षे हा त्याच्या मुळ गावी ग्राम खिलवाँ, पो. बकुलारी, पोलीस ठाणा-गुठनी, जिल्हा सिवान, राज्य बिहार येथे निघुन गेल्याचे तांत्रिक माहितीवरुन निष्पन्न झाल्याने त्याचा शोध घेण्यासाठी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ चे स.पो.निरी, पुषराज सुर्वे, पो.हवा. पुष्पेंद्र थापा, पो.हवा.विकास राजपुत, पो.कॉ. सनी सुर्यवंशी असे तपास पथक बिहार राज्यात रवाना करण्यात आले होते.

तपास पथक आरोपीताचा त्याच्या गावात शोध घेत असताना गुप्त बातमीदाराकडून त्याचे रविवार दिनांक ११/०६/२०२३ रोजी लग्न असल्याची पथकास माहीती मिळाली होती. परंतु, आरोपीतास त्याचा पोलीस शोध घेत असल्याची कुणकुण लागल्याने तो तेथून परागंदा झाला. तांत्रिक माहितीदवारे आरोपी हा सलेमपुर जिल्हा देवरिया, राज्य उत्तर प्रदेश येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास गांधीचौक, सलेमपुर बाजार, देवरियाँ राज्य उत्तरप्रदेश येथून स्थानिक पोलीसांच्या मदतीने दिनांक ०५/०६/२०२३ रोजी ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून गुन्हयातील मोबाईल जप्त करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात त्याने सदचा गुन्हा हा स्वत:च्या लग्नासाठी येणाऱ्या खर्चासाठी केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, स.फौ.राजु तांबे, संदीप शिंदे, संजय पाटील, संजय शिंदे, संतोष लांडगे, विजय गायकवाड, प्रफुल्ल पाटील, पो.हवा. पुष्पेंद्र थापा, विकास राजपुत, पो.शि. सनी सुर्यवंशी, प्रशांत विसपुते तसेच सायबर गुन्हे शाखेचे सहा. फौज. संतोष चव्हाण, पोशि. कुणाल सावळे यांनी केली असुन पोलीस निरीक्षक गोपाल पांडेय, पो.कॉ. चंदन गेहलोत (पोलीस ठाणे गुठणी, जिल्हा सिवन राज्य उत्तर प्रदेश) यांनी स्थानिक मदत केली आहे.



----oooo----